# बृहन्मुंबई महानगरपालिका

**( घन कचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग )**

क्र. सहा. अभि. / घकव्य / 5275 / आर/उत्तर दि. 08.12.2017

## जाहिरात

**"स्वच्छ मुबई प्रबोधन अभियान"**
**स्वच्छता – मनापासुन शहरापर्यंत**

विषय:- आर/उत्तर विभागात 'स्वच्छ मुबई प्रबोधन अभियान' ( वस्ती स्वच्छता योजना ) राबविण्याबाबत.

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान ( वस्ती स्वच्छता योजना ) राबविण्याकरीता आर/उत्तर विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत बचतगट तसेच 31.12.2015 पूर्वी नोंदणीकृत असणा-या इच्छुक शासन नोंदणीकृत स्थानिक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था तसेच बचतगट कडुन संस्थामार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरीता संस्थांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरीता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना ) | 30 संस्थाच्या ( 370 स्वयंसेवक ) |

अर्जाचा नमुना आणि स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान बाबतची नियमावली आर/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात दि. **11.12.2017** ते दि. **20.12.2017** या कालावधीत, सकाळी 10.30 ते दुपारी 4.00 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन दि. **03.01.2018** रोजी सोडत काढण्यात येइल. सदर सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील कामाचा कालावधी दि. 21/01/2018 ते दि. 20/07/2018 या कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालया मार्फत या योजना राबविण्याबाबत निर्देश देण्यात येतील जे लवकर असेल, त्यानुसार संस्थांनी स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

संस्थेने आर/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. **20.12.2017** (दुपारी 3.00 वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक आयुक्त
'आर/उत्तर' विभाग